दै. प्रजावाणी दि. 08.02.25

रेतीसह ५७ लाख २० हजार रुपयांचे उपसा साहित्य जप्त

# अवैध रेती उपसा घाटावर पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी • नांदेड





महसुल विभागासह अवैध वाळू उपसा करणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनीही कंबर कसली आहे. सलग दुसऱ्यादिवशी पोलिसांनी विष्णुपुरी तसेच कल्हाळ गावाच्या नदीकाठावरील शिवारात धाड टाकून, वाळूसह ५७ लाख २० हजार रुपयांचे साहित्य जप्त करून, नांदेड ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

विष्णुपुरी आणि कल्हाळ गावाच्या शिवारात असलेल्या गोदावरी नदीकाठावर अवैध वाळु उपसा सुरु असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यावरून गुरुवारी (दि.सहा) सहकाऱ्यांसह सदर ठिकाणी धाड टाकली. तेथून दोन लोखंडी बोट, वाळु उपसा करणारे इंजन, १०५ ब्रास रेती, एक जेसीबी मशीन, तीन लोखंडजी क्रेन, पाच लोखंडी पाईप असा एकूण ५१ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सपोउपनि माधव विठ्ठल गवळी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी चंद्रा गोविंद सिरसागर, भानुदास यशवंत सिरसागर, मन्टेसिंग (सर्व रा. कल्हाळ) आणि शेख मेहराजोद्दीन शेख निजामोद्दीन (रा. विष्णुपुरी) यांच्याविरुद्ध नांदेड ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई सपोनि सुरेश मांटे, पोउपनि साईनाथ पुयड, पोका. बालाजी कदम, विलास कदम, संदीप घोगरे, घेवारे, सपोउपनि माधव गवळी, ज्ञानेश्वर तिडके यांच्यासह स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी केली आहे. शहर व जिल्ह्यामध्ये वाळू तस्करांनी धुमाकूळ घातलेला आहे. महसूल प्रशासन कमी पडत असल्याने आता वाळूतस्करांच्याविरोधात पोलीस प्रशासनानेही कंबर कसली असून कारवाईचा धडाका लावला आहे.